**विषय:-** "प्रधानमंत्री कुसुम" योजना घटक 'ब' च्या अंमलबजावणीविषयी महावितरणचे अधिकारी / कर्मचारी यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत.

दि. १३ जानेवारी, २०२१ रोजी कुसूम योजनेच्या 'ब' घटकाच्या अंमलबजावणीसाठीची बैठक मा. प्रधान सचिव (ऊर्जा) तथा मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांनी घेतलेली होती. सदर बैठकीमध्ये या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाऊर्जा व महावितरण यांनी एकत्रितरित्या कार्यवाही करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने महाऊर्जाकडून तत्वत: मान्यता (In Principle Sanction) दिलेल्या लाभार्थ्यांची यादी प्राप्त झाल्यानंतर महावितरणचे अधिकारी / कर्मचारी यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

**अ. सौर कृषी पंप आस्थापना - स्थळ निरिक्षण अहवाल (Joint Survey Report)**

१. महाऊर्जाकडून जिल्हा निहाय तत्वत: मान्यतेनुसार पात्र लाभार्थ्यांची यादी महावितरणचे संबंधित उप अभियंता / शाखा अभियंता यांचेकडे पाठविण्यात येईल. सदरची यादी संबंधित कार्यालय प्रामुख्याने त्याच दिवशी लाईनमन यांना त्यांचे कार्यक्षेत्रानुसार विभागून दयावी, व त्याची माहिती संबंधित महाऊर्जा विभागीय महाव्यवस्थापक यांना ई-मेलव्दारे पाठवावी.

२. लाईनमन यांचा मोबाईल नंबर व बँक खातेबाबतची माहिती उप अभियंता / शाखा अभियंता, महावितरण यांनी महाऊर्जा विभागीय महाव्यवस्थापक यांना द्यावी.

३. लाईनमन यांनी यासाठी महाऊर्जाने विकसित केलेले मोबाईल ॲप डाऊनलोड करून त्यांचेकडील प्राप्त यादीनुसार मोबाईल ॲपचा वापर करून स्थळ पाहणी करावी. स्थळ पाहणी ॲपमध्ये देण्यात आलेली माहिती व प्रत्यक्षात वस्तुस्थिती यानुसार आपला अहवाल मोबाईलव्दारे घेतलेल्या छायाचित्रासह (अक्षांश / रेखांशसह) मोबाईल ॲपव्दारे ऑनलाईन सादर करावा.

४. महाऊर्जा विभागीय महाव्यवस्थापक यांचेशी समन्वय ठेऊन कुसूम योजनेचे मोबाईल ॲप लाईनमन यांचे मोबाईलवर डाऊनलोड केले जाईल व त्याचा वापर लाईनमन यांना करता येतो याबाबत खातरजमा महावितरण उप अभियंता / शाख अभियंता यांनी करावी.

५. सदर स्थळ पाहणीवेळी लाभार्थी व कंत्राटदाराचे प्रतिनिधी उपस्थित असतील. स्थळ पाहणीवेळी पाण्याच्या शाश्वत स्त्रोताबाबत खातरजामा करावयाची आहे व त्याचे छायाचित्र अपलोड करावयाचे आहे.

६. लाईनमन यांना उपरोक्त कामापोटी मानधन देण्यात येईल. ते त्यांच्या बँक खात्यामध्ये महाऊर्जाकडून जमा करणेत येईल.

**ब. सौर कृषी पंप आस्थापनेनंतर - संयुक्त तपासणी अहवाल (Joint Inspection Report)**

१. सौर कृषी पंप आस्थापनेनंतर लाईनमन यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील पंपाची तपासणी करून सदरचा पंप योग्यप्रकारे कार्यरत असलेबाबत खातरजमा करावी. त्याबाबतचा संयुक्त तपासणी अहवाल (Joint Survey Report) मोबाईल ॲपव्दारे ऑनलाईन सादर करावा.

२. सौर कृषी पंप योग्य प्रकारे कार्यरत रहाण्यामध्ये काही त्रुटी असल्यास त्याबाबतची माहिती ऑनलाईन सादर करावी.

३. लाईनमन यांना उपरोक्त कामापोटी मानधन देण्यात येईल. ते त्यांच्या बँक खात्यामध्ये महाऊर्जाकडून जमा करणेत येईल.